# महाराष्ट्र विधानसभा
## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## बुधवार, दिनांक ३ एप्रिल, २०१३
## (सकाळी ११.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे -**

**दोन : कागदपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**मुख्यमंत्री** : श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी), अधिनियम, २००४ च्या कलम २५ च्या पोट-कलम (४) अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी), (व्यवस्थापन समितीच्या सदस्यांची नियुक्ती आणि प्रतिज्ञापत्राचे नमुने) नियम, २०१३ प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक एसएसव्ही-२०१२/प्र.क्र.३३/का सोळा, दिनांकित २४ जानेवारी, २०१३ सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : विशेषाधिकार भंगाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स.नियम २७३ अन्वये).**

**चार : स्थगन प्रस्तावाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).**

**पाच : औचित्याचे मुद्दे - (असल्यास).**

**सहा : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

(१) **सर्वश्री अबू आजमी,** शरद गावीत, रशीद ताहिर मोमीन**,** अमीन पटेल, जगन्नाथ शेट्टी, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्वच्छता व आरोग्य उपविधी-२००६ अंतर्गत घनकचरा संकलन-वहन-विल्हेवाट-प्रचालनाच्या अंतर्गत प्रतिदिन ६,५०० मेट्रीक टन घनकचरा संकलित होणारी ८० वर्षे जुनी क्षपणभूमी बंद करण्याचा महानगरपालिकेचा निर्णय, सदर घनकचऱ्यापासून बायो-मिथेनायझेशन प्रक्रियेची असलेली टंचाई, परिणामी भूगर्भातील पाण्याचे जलस्त्रोत प्रदूषित होणे, सदर भागातील जल व वायू प्रदुषणामुळे २५०० मेट्रीक टन घनकचऱ्यामध्ये मुख्यत्वेकरुन सुका व ओला घनकचरा, मृत जनावरे यांचा प्रामुख्याने समावेश असणे, घनकचऱ्यात जवळपास जैविक वैद्यकीय घनकचरा व अन्य घनकचऱ्यातून अनुक्रमे जैविक खतनिर्मिती, गांडुळखत, गांडुळशेती, भूमीभराव यासाठीच्या प्रयोजनार्थ अनुक्रमे देवनार, मुलूंड व कांजूर येथे क्षपणभूमी अस्तित्वात असणे, तथापि देवनार क्षपणभूमीच्या परिसरात दिवसेंदिवस निर्धारित क्षमतेपेक्षा जास्त घनकचरा संकलन होवूनही

सदर परिसराचा व्यवस्थापन-घनकचरा संकलन-वर्गीकरण-पुनर्प्रक्रिया-घनकचऱ्याची विल्हेवाट यामुळे प्रतिदिन ५ मेट्रीक टन घनकचऱ्याचा वापर होणे, घनकचराविषयक विशेष स्वच्छता अभियान व दत्तक वस्ती योजना प्रामुख्याने राबविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर माहे फेब्रुवारी २०१३ मध्ये दिसून येत असलेली उदासिनता, परिणामी परिक्षेत्रातील स्थानिय जनतेला उग्र दर्प व घनकचऱ्यातून झिरपणाऱ्या दुर्गंधीयुक्त घाण पाण्याचा नाहक सोसावा लागणारा त्रास व सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न व त्याचबरोबर तेथील नागरी प्रशासनास विकासाच्या दृष्टीकोनातून भरीव अर्थसहाय्य करण्याची निर्माण झालेली आवश्यकता, याबाबतीत शासनाकडे वेळोवेळी पाठपुरावा करुनही अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही न होणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्री राजन विचारे,** एकनाथ शिंदे, प्रताप सरनाईक, प्रकाश महेता, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"मुंबई विद्यापीठाच्या ठाणे उपकेंद्राच्या निर्मितीसाठी करावयाचे बांधकाम माहे ऑक्टोबर २०१२ मध्ये सुरु करुन सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षात काही शैक्षणिक उपक्रम सुरु करण्याचे विद्यापीठाने मान्य करुनही अद्याप विद्यापीठाने व शासनाने विद्यापीठाच्या उपकेंद्राचे कोणत्याही प्रकारचे बांधकाम सुरु न करणे, त्यामुळे विद्यापीठाने उपकेंद्रासाठी अर्थसंकल्पात तरतूद केलेला रुपये ५ कोटींचा निधी व्यपगत होण्याची निर्माण झालेली भीती लक्षात घेता सदर बाब लोकप्रतिनिधींनी शासनाच्या निदर्शनास आणून देणे, सदर प्रकरणी मुंबई विद्यापीठाकडून होणारी चालढकल, विद्यापीठाने सन २०१२-१३ यासाठी ठाणे उपकेंद्रांच्या विकासाकरिता दिलेल्या ५ कोटी रुपये निधीतून संरक्षण भिंतीचे काम अद्यापही सुरु न करणे, ठाणे महानगरपालिकेने विद्यापीठाच्या उपकेंद्रासाठी नाममात्र भाड्याने उपलब्ध करुन दिलेल्या २६,३२५ चौ.मी. जमिनीवर स्थानिकांचे होणारे अतिक्रमण, विद्यापीठाच्या कामाचे भूमिपूजन होऊन दोन वर्षे उलटूनही कोणत्याही प्रकारच्या कामास सुरुवात न होणे, याबाबत तेथील लोकप्रतिनिधींनी वारंवार शासनाकडे पाठपुरावा करुनही त्याची दखल न घेणे, या प्रकरणी मुंबई विद्यापीठाचे व शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी तेथील नागरिकांमध्ये पसरलेला असंतोष, या प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(३) **सर्वश्री शशिकांत शिंदे,** हनुमंत डोळस, दिपक चव्हाण, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"सातारा जिल्हयातील वसना व वांगणा या प्रकल्पांसाठी बऱ्याच शेतकऱ्यांच्या जमिनी अधिग्रहीत करण्यात येणे, शेतकऱ्यांच्या ७/१२ च्या उताऱ्यावर 'पुनर्वसित' अशी नोंद घेतली जाणे, काही शेतकऱ्यांच्या ७/१२ च्या उताऱ्यावर अद्यापही नोंद तशीच असल्यामुळे शेतकऱ्यांना बँकेकडून कर्ज मिळणे, जमिनीची विक्री करणे इत्यादी व इतर प्रकारचे लाभ न मिळणे, ७/१२ च्या उताऱ्यावर नोंद कमी करणेबाबत तेथील शेतकऱ्यांनी वेळोवेळी शासनाकडे मागणी करूनसुध्दा अद्यापही ७/१२ च्या उताऱ्यावर नोंद कमी न झाल्याने शेतकऱ्यांत पसरलेला तीव्र असंतोष, शेतकऱ्यांच्या ७/१२ च्या उताऱ्यावर 'पुनर्वसित' ही नोंद काढण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

**( दुपारी १.३० ते २.०० वाजेपर्यंत - मध्यंतर )**

**सात : सन २०१३ - २०१४ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा व मतदान (तिसरा दिवस).**

(१) सामान्य प्रशासन विभाग.

(२) नगरविकास विभाग.

(३) विधी व न्याय विभाग.

(४) मराठी भाषा विभाग.

**(मतास टाकावयाच्या मागण्यांची सूची स्वतंत्रपणे वितरीत केल्याप्रमाणे)**

**आठ : विधानपरिषदेने संमत केल्याप्रमाणे, विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

सन २०१३ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १ - महाराष्ट्र स्वयं-अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१३.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २ एप्रिल, २०१३.

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.